पेसा ग्रामपंचायतींना ५% निधी योजनेतंर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून केलेल्या कामावरील खर्चाचे लेखापरिक्षण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पेसाअ-२०१७ /प्र.क्र.१४४/का-१७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा :</u>
१. शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग,क्र.पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का-१७, दि.२१ एप्रिल,२०१५
२. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र : पेसाअ - २०१५/प्र.क्र.९८/का-१७, दि.२१ ऑगस्ट,२०१५
३. शासन शुध्दीपत्रक आदिवासी विकास विभाग, पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का.१७, दि.२० फेब्रवारी,२०१६

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाचा ५% निधी उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णय दि.२१/०४/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील (मार्गदर्शक सुचनांतील) २(७) व २(८) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

> २(७) सदर निधीबाबतचे सर्व लेखे हे महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत),नियम, २०१४ प्रकरण तीन, ग्रामसभा लेखे मधील नियम क्रमांक १४,१५ व १६ नुसार ठेवावीत.
>
> २(८) फक्त ज्या ग्रामपंचायती, स्थानिक वन व्यवस्थापन समिती यांचे मागील एक वर्षाचे लेखा परीक्षण, स्थानिक निधी लेखा परीक्षा पथकाकडून झाले नसल्यास त्रयस्थ लेखा परिक्षकाकडून लेखा परीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे.

संदर्भ क्र.२ वरील दि.२१/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये ग्रामसभा कोष संदर्भात मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्यातील अनुक्रमांक १७ येथे "पंचायतीने ग्रामसभेच्या मान्यतेने ग्रामसभा कोषातुन हाती घेतलेल्या सर्व कामांच्या खर्चाचे लेखापरिक्षण सनदी लेखापाल (सी.ए.) मार्फत दरवर्षी करुन घेणे बंधनकारक असेल" असे नमुद केले आहे. सदरची विसंगती दुर करण्याकरीता व यामध्ये स्पष्टता येण्याकरीता पेसा ग्रामपंचायतींना ५% थेट निधी योजनेतंर्गत देण्यात येणाऱ्या निधीतून केलेल्या कामांच्या खर्चाचे लेखापरिक्षणसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार शासन निर्णय दि.२१/०४/२०१५ व दि.२१/०८/२०१५ मधील विसंगती दुर करण्याकरीता व यामध्ये स्पष्टता येण्याकरीता पेसा ग्रामपंचायतींना ५% निधी योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या निधीतून केलेल्या कामांच्या खर्चाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखा परीक्षा पथकामार्फत करण्यात शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. याबाबतचे लेखापरिक्षण संदर्भाधीन शासन निर्णय दि.२१/०४/२०१५ व दि.२१.०८.२०१५ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार तसेच, नियमीतपणे होईल याची संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांनी दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय ग्राम विकास विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.८८/वित्त-४ दि.२९/०८/२०१७ नुसार प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००४१२०२४८७०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gajanan Ramdas Deshmukh

Digitally signed by Gajanan Ramdas Deshmukh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9adf2fe1f77176611c6dae66e0049cd0f51f36579d7c577ba3ed2c944d27d926, cn=Gajanan Ramdas Deshmukh
Date: 2017.10.04 11:52:06 +05'30'

(गजानन रा. देशमुख)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
७. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
८. सचिव (ग्रामविकास विभाग), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.
११. जिल्हाधिकारी, ठाणे पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर गडचिरोली, पुणे, नांदेड.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.

१३. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, ६वा मजला, नवी मुंबई-४०० ६१४
१४. सह सचिव/उप सचिव, (सर्व) आदिवासी विकास विभाग
१५. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर.
१६. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१७. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जिल्हा परिषद, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.
१८. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे व नांदेड जिल्हयातील सर्व पेसा तालुके)
१९. सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग
२०. निवडनस्ती (का.१७).